# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## येशूचा बाप्तिस्मा रविवार – ०९ जानेवारी २०२२

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू : माझ्या बंधू भगिनींनो, आज आपण आपला तारणकर्ता प्रभू येशू ह्याच्या बाप्तिस्माचा सण साजरा करीत आहोत. प्रभूच्या बाप्तिस्म्याच्या वेळी हा माझा परमप्रिय पुत्र आहे अशी आकाशवाणी ऐकू आली. देवपित्याच्या परमप्रिय पुत्राच्या प्रेमावर विश्वास ठेऊन आपण आपल्या प्रार्थना त्याच्या चरणी अर्पण करू या.

प्रतिसाद : **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रभूच्या बाप्तिस्माचा संदेश भाविकांपर्यंत पोहचविण्यासाठी कृपा आणि चांगल्या आरोग्याची देणगी मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी त्यांना मिळालेल्या अधिकाराचा वापर देशाच्या विकासासाठी करत असताना सामान्य माणसाच्या मूलभूत व वैद्यकीय गरजांकडे विशेष लक्ष द्यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. बाप्तिस्मा साक्रामेंत हे आपल्या श्रद्धेचे प्रवेशद्वार आहे. ह्या साक्रामेंताद्वारे मूळ पापाच्या कलंकापासून शुद्ध होऊन आपल्याला पवित्र आत्म्याची दानं आणि फळं मिळत असतात. ह्या दानांचा योग्य तो वापर आपल्याला करता यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. बाप्तिस्मा साक्रामेंता अगोदर उमेदवारांची धर्म श्रद्धेत वाढ करण्याची जबाबदारी आईवडील व धर्म आईवडील स्वीकारत असतात. ही जबाबदारी योग्य रितीने पार पाडण्यास त्यांना प्रभूचा कृपाआशीर्वाद मिळावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेषकरून जे आजारी आहेत अशावर प्रभूचा वरदहस्त असावा, कोरोनो विषाणूपासून व सर्व नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे तसेच उदया/आज विवाहबद्ध होणा-या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू : हे प्रभो परमेश्वरा, तुझ्या परमप्रिय पुत्राच्या बाप्तिस्माच्या दिवशी तुझ्याकडे आम्ही करीत असलेल्या प्रार्थना तू ऐकून घे. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.